# <u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)</u>

**सभा क्र.३/२०२५** **दिनांक २९/०३/२०२५**
**स्थळ-साई निवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **शनिवार दि.२९.०३.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह येथे** आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/४५९२/२०२५ दि.२७.०३.२०२५ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **शनिवार दि.२९.०३.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह येथे** मा.श्रीमती अंजु शेंडे (सोनटक्के) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के),**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **दि.२७.०२.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१५६ दि.२७.०२.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. सन २०२५-२६ करीता भाजीपाला खरेदीसाठी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१५७/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**२. शिर्डी येथे दि.०३.०२.२०२५ रोजी दुर्दैवी निर्घृण हत्या झालेल्या संस्थानच्या मयत कर्मचा-यांना आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.१५७/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**३. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२५-२६ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१५७/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

४. श्रींचे दर्शनासाठी विविध ठिकाणाहून पालखी घेऊन पायी तसेच खाजगी अथवा सार्वजनिक वाहनांव्दारे शिर्डीत येणा-या श्री साईभक्तांचा अपघाती विमा उतरविणेबाबत.

**निर्णय क्र.१५७/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

५. श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाची नियमावली अंतीम करुन आलेल्या अर्जावर कार्यवाही करणेबाबत.

**निर्णय क्र.१५७/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

६. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सेवाप्रवेश विनियम-२०२५ बाबत.

**निर्णय क्र.१५७/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

७. संस्थानचे मौजे पांगरी, सिन्नर तालुका औद्योगिक वसाहत मर्या.सिन्नर (मुसळगाव) व पांढुर्ली, ता.सिन्नर तसेच येसगांव ता.कोपरगाव पालखी थांब्याची दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम करणेकरीता ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार वैभव शंकर तांबे, दाढ यांना कार्यादेश देणेबाबत.

**निर्णय क्र.१५७/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.३ श्री साई प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी लिक्वीड सोफ खरेदीकामी ई-निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१५८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.४ प्रसादालय विभागासाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी खाद्यतेल खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१५९ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.५ सन २०२५-२६ वर्षासाठी कॅन्टीन विभागाकरीता टोन्ड गाय दुध खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.६ सन २०२५-२६ वर्षासाठी कॅन्टीन विभागाकरीता पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.७ प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन आणि मंदिर विभागासाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी मसाले खरेदी कामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.८** **संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी सन २०२५-२६ वर्षासाठी किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी, ड्रायफ्रुटस, वनस्पती तूप व इतर वस्तु खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६३** **मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई व मे.रतनचंद उत्तमचंद सरनोत, लोणी हे ज्या ठिकाणी एल-१ आहेत, त्यांना पुरवठा आदेश न देता त्यांचे ठिकाणी एल-२ निविदाधारकाशी चर्चा वाटाघाटीसाठी करुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा. उर्वरीत प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.९** **प्रसादालय, लाडू निर्मिती आणि मंदिर विभागासाठी सन २०२५-२६ वर्षासाठी गहु, तांदुळ, साखर व हरभरा दाळ खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६४** **मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई व मे.रतनचंद उत्तमचंद सरनोत, लोणी हे ज्या ठिकाणी एल-१ आहेत, त्यांना पुरवठा आदेश न देता त्यांचे ठिकाणी एल-२ निविदाधारकाशी चर्चा वाटाघाटीसाठी करुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा. उर्वरीत प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१०** **कॅन्टीन विभागाकरीता सन २०२५-२६ साठी बिस्कीटे खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६५** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.११** **संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६६** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१२** **मंदिर विभागासाठी रानशेणी व थापील गोवरी खरेदीकामी दरपत्रकाव्दारे प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६७** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१३** **कॅन्टीन विभागासाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी बायोडीग्रेडेबल पेपर कप खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.१६८** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१४** **कॅन्टीन विभागासाठी सन २०२५-२६ वर्षासाठी चहा पावडर व फिल्टर कॉफी खरेदी कामी वार्षिक न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६९** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१५** **सन २०२५-२६ करीता गाईचे शुध्द तूप खरेदी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील मंजूर दराने गाईचे शुध्द तूप खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.१७०** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१६** **मे.रतनचंद उत्तमचंद सरनोत, लोणी यांचे सन २०२४-२५ करीता किराणामाल साहित्य अनियमित पुरवठयाबाबत.**

**निर्णय क्र.१७१** **मे.रतनचंद उत्तमचंद सरनोत, लोणी यांना काळया यादीत का टाकु नये याबाबत लेखी नोटीस देण्यात यावी.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१७ मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई यांचे सन २०२४-२५ करीता किराणामाल साहित्य अनियमीत पुरवठयाबाबत.**

**निर्णय क्र.१७२ मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई यांना काळया यादीत का टाकु नये याबाबत लेखी नोटीस देण्यात यावी.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१८ मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.१५/२०२० मधील होणा-या निर्णयास अधीन राहून सध्याचे सिक्युरीटी कंत्राटदार यांना दि.०१.०७.२०२५ ते दि.३१.१२.२०२५ अखेर पर्यंत सध्याचे आहे त्याच दरात मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.१७३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.१९ संस्थानमध्ये ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत लेबर, सिक्युरिटी तसेच निवासस्थाने, रुग्णालये, प्रसादालय इ.विभागात हाऊसकिपींग, स्वच्छता व इतर ठोक पध्दतीने करणेत येणा-या कामांसाठी नेमण्यात आलेल्या ठेकेदाराकडील कंत्राटी कर्मचा-यांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियम) अधिनियम-२०१७ नुसार रजा व सुट्टया लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.१७४ अर्जीत रजा वगळता इतर सुट्टया मंजूर करण्यात याव्यात. तसेच या सुट्टया दिल्यामुळे संस्थानवर कुठलाही आर्थिक बोजा पडणार नाही याची दक्षता घ्यावी. रजा सुट्टया देणेकामी नवीन मनुष्यबळ भरती करु नये. वैद्यकीय संचालक यांनी आपले कर्मचा-यांच्या सुट्टयाबाबत कंत्राटदार यांचेशी चर्चा करुन याबाबत निर्णय घ्यावा.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.२० श्री साईबाबांचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांचे विनंतीनुसार, साईसेवकांचे वयाची मर्यादा वाढविणे व इतर अनुषंगीक बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.१७५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.२१ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील ११ महिने कालावधीसाठी संस्थान आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारीक/परिचारीका यांचा पगारवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

**निर्णय क्र.१७६ प्रस्ताव मंजूर. सदर कार्यवाही पुढील आर्थिक वर्षात १ एप्रिल,२०२५ पासून करण्यात यावी.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.२२ माहिती तंत्रज्ञान विभागातील सॉफ्टवेअर प्रोग्रामर पदाचे एकत्रित मानधन वाढवून मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१७७ प्रस्ताव मंजूर. सदर कार्यवाही पुढील आर्थिक वर्षात १ एप्रिल,२०२५ पासून करण्यात यावी.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.२३ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडे संस्थान आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी नेमणूकीवर असलेले वैद्यकीय अधिकारी (आरएमओ व सीएमओ, दंत रोग तज्ञ) जनसंपर्क व्यवस्थापक व सहाय्यक जीव वैद्यकीय यंत्र अभियंता यांचे मासिक मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.१७८ प्रस्ताव मंजूर. मुळ बेसीक वर तीन टक्के वार्षिक वेतनवाढ देण्यात यावी. नवीन कंत्राटी कालावधीकरीता आदेश देतेवेळी वाढ देण्यात यावी.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.२४ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामी निम्नतम दर निविदाधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छत्रपती संभाजीनगर यांनी चर्चा/वाटाघाटी अंती देऊ केलेले अंतिम दर रक्कम रु.४८,५०,०००/-(सर्व करांसहीत) इतके दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१७९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२५ मौजे शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे विभागास बुकींग काऊंटरसाठी वापरास दिलेल्या सेवाधाम इमारतीतील दोन रुम तसेच साईबाबा हॉस्पिटल परिसरात सेट्रंल बॅकेच्या ए.टी.एम. साठी लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर वापरावयास दिलेल्या गाळे/रुम्सच्या मुदत वाढवून मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२६ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.,शिर्डी यांना गेट नं.४ येथे मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी तसेच एस.टी.स्टॅन्ड, शिर्डी समोर स्वागत कक्ष बॅग क्लोकरुम साठी भाडेतत्वावर वापरावयास दिलेल्या जागेच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.१८१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२७ प्रसार भारती, आकाशवाणी, अहिल्यानगर यांना त्यांचे लघुप्रक्षेपन केंद्रासाठी संस्थान मालकीची लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर वापरास दिलेल्या मोकळया व बांधीव जागेच्या भाडे निश्चीतीबाबत.**

**निर्णय क्र.१८२ प्रस्ताव मंजूर. शासनाकडे प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२८ श्री रामनवमी उत्सव-२०२५ मधील श्रींच्या पोथी व प्रतिमेच्या मिरवणूकीत वीणा, पोथी, प्रतिमा धरणे तसेच पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमासाठी मान्यवरांची नांवे निश्चीत होणेबाबत.**

**निर्णय क्र.१८३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२९** **श्री.सुरेश रमेश घायतडकर, सुरक्षा रक्षक, संरक्षण विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१८४** **प्रस्ताव मंजुर. तात्काळ विभागीय चौकशी सुरु करावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३०** **श्री.संतोष भिमराज जाधव, मदतनीस, श्री साईबाबा निवासस्थान विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१८५** **प्रस्ताव मंजुर. तात्काळ विभागीय चौकशी सुरु करावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३१** **श्री. संजय रामदास राऊत, वॉर्डबॉय, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१८६** **प्रस्ताव मंजुर. तात्काळ विभागीय चौकशी सुरु करावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३२** **श्री.श्रावण तुकाराम कोते, मदतनीस (पाहरेकरी) संरक्षण विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१८७** **प्रस्ताव मंजुर. तात्काळ विभागीय चौकशी सुरु करावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३३** **अ) श्रींचे समाधी मंदिराचे समोरील संगमरवरी नंदीची मुर्ती भंग झाली असल्याने त्या ऐवजी नवीन चांदीची मुर्ती देणगी स्विकारणेबाबत.**

**ब) श्री दत्त मंदिराचे मागील समकालीन साईभक्तांचे समाधी करीता चांदीच्या पादुका देणगी स्विकारणेबाबतचे प्रस्तावावर पुर्नविचार होणेबाबत.**

**निर्णय क्र.१८८** **प्रस्ताव ‘अ’ मंजुर. नंदीची जुनी मुर्ती काढल्यानंतर त्याबाबत योग्य तो निर्णय नंतर घेण्यात येईल. प्रस्ताव ‘ब’ मंजुर.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३४** **श्री व्दारकामाई समोरील भिंतीवरील निंबराचे वरील भागात सुवर्ण “ओम (ॐ) ” देणगीदाखल बसविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८९ जागा पाहणी करुन “ओम साई (ॐसाई) ” या नावाने सुवर्ण अक्षराची देणगी प्राप्त झाल्यास ती स्विकारण्यात यावी. देणगी घेण्यात येणारी सुवर्ण अक्षरे सध्या व्दारकामाईत असलेल्या श्रध्दा आणि सबुरी या अक्षरांच्या आकाराचे असावे.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३५** **संस्थानचे वतीने भारतीय वंशाच्या गायांची गोशाळा सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१९० प्रस्ताव मंजूर. प्रथम १०० गाईंसाठी गोशाळा सुरु करावी. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३६** **सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मुदतठेवीमध्ये गुतंवणूक केलेली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मुदतपूर्ती होणारी रक्कम कमाल व्याजदर देणा-या राष्ट्रीयकृत बॅंकामध्ये मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.१९१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३७** **माहे डिसेंबर-२०२४ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१९२ अवलोकन करुन नोंद घेतली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.३८** **माहे जानेवारी-२०२५ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१९३ अवलोकन करुन नोंद घेतली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.३९ करनिर्धारण वर्ष २०२४-२५ चे आयकर विभागाकडून प्राप्त झालेल्या कर परतावा (Tax Refund) रकमेची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१९४ अवलोकन करुन नोंद घेतली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४० देणगीदार साईभक्तांना द्यावयाच्या सुधारीत सेवा सुविधांबाबत.**

**निर्णय क्र.१९५ प्रस्ताव मंजूर. सदरची सुविधा वर्षभरातील संस्थानमार्फत साजरे करण्यात येणारे चार प्रमुख उत्सव वगळता देण्यात यावी.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४१ शिर्डी नगरपंचायत, शिर्डी मालकीच्या सर्व्हे नं.१५९ मध्ये 'श्री साईबाबा थिमपार्क' उभारणी करणेसाठी निधी मंजूर करणेबाबत.**

**निर्णय क्र.१९६ प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी. तसेच प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा.**

**(कार्यवाही- लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.४२ साई आश्रम भक्तनिवास ॲम्पिथिएटरमधील महिला आणि पुरुषांसाठीचे जनरल टॉयलेट ब्लॉकचे नुतनीकरण व दुरुस्ती करणे तसेच साई आश्रम भक्तनिवास येथील प्रसाद भोजन कक्षातील फ्लोरिंग बदलणेकामी येणारे एकित्रत रक्कम रु.३०,२९,४४९/-मात्रचे अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१९७ प्रस्ताव मंजूर. फ्लोरिंग फिक्या रंगाची असावी.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४३** **संस्थानचे हेलिपॅड व शैक्षणिक संकुलाकडे जाण्यासाठी अ.नगर मनमाड महामार्ग ते गोदावरी उजवा कालवा या भागात संस्थानमार्फत वितरीका क्र.११ मध्ये पाईपलाईन टाकुन त्यावर केलेल्या रस्त्याचे रुंदीकरण करुन डांबरी रस्ता विकसीत करणेसाठी अंदाजे रु.२१.९४ कोटी खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१९८** **प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी. तसेच प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४४** **श्री साईबाबा मंदिर नवीन दर्शनरांग इमारतीचे समोर साईभक्तांचे सुविधेकरीता उभारणेत येणारे शेड व संस्थानचे सुलभ शौचालयाचे पाठीमागील वाहन पार्किंग तसेच मंदिर परिसर गेट नं.४ येथे तयार करावयाच्या टेंसाईल फेब्रीक शेडचे कामासाठी ठेकेदार सुभाष कन्स्ट्रक्शन कंपनी, डोंबीवली यांना कुठलीही भाववाढ/दरवाढ न देता काम पुर्ण करणेसाठी दि.१५/०६/२०२५ अखेर केलेल्या मुदतवाढीचे विनंतीबाबत.**

**निर्णय क्र.१९९** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४५** **श्रींचे पुरातन वस्तुंचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक वस्तु संग्रहालय, प्रसंगचित्र व समकालीन संत व साईभक्तांचे फोटो गॅलरी तसेच ग्रंथालयाकरीता भव्य इमारतीचे बांधकाम करणेकामी सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.२००** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरात भारतीय राष्ट्रीय ध्वज स्तंभ उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.२०१** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४७** **शिर्डी संस्थान व कनकुरी वाढीव संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ (सुधारीत) करीता सल्लागार मानवसेवा कंन्स्लंटंट, धुळे यांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर प्रकल्पासाठी येणारे रक्कम रु.११०.१० कोटी मात्रचे अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास तसेच प्रकल्पाचे कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणे व इतर अनुषंगीक बाबींवर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.२०२** **प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी. तसेच प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा. या कामाचे पर्यवेक्षण करणेसाठी एका कार्यकारी अभियंत्याची आवश्यकता आहे, त्याबाबत शासनाकडे प्रतिनियुक्तीने नेमणूकीसाठी मागणी करावी.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४८** **शिर्डी पोलीस गेस्ट हाऊस व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिर्डी यांना पिण्याचे पाणी पुरविणेबाबत अनुक्रमे उपविभागीय अधिकारी, शिर्डी व मुख्याध्यापक, जि.प.प्राथ. शाळा शिर्डी यांनी केलेल्या मागणीबाबत.**

**निर्णय क्र.२०३** **शिर्डी पोलीस गेस्ट हाऊस बाबत प्रथम मागील थकबाकी भरुन घेण्यात यावी व त्यानंतर प्रस्ताव फेर सादर करावा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिर्डी यांना नगरपालीकेमार्फत पाणी पुरवठा होत असल्यामुळे त्यांचा प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.४९** **शिर्डी नगरपरिषद, शिर्डी करीता सुका कचरा प्रक्रिया प्रकल्प (RDF) उभारणीकामी अनुदान देणेबाबत.**

**निर्णय क्र.२०४** **टप्प्याटप्प्याने नगर पालीकेला दहा कोटी रुपये अनुदान देण्याचा प्रस्ताव मंजूर. त्यापैकी सध्या पहिला टप्पा तीन कोटी रुपये अदा करणेत यावे. उपयोगीता प्रमाणपत्र व झालेल्या कामाची प्रगती पाहून पुढील टप्प्यातील अनुदान रक्कम अदा करावी.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.५०** **साईआश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास विभागाकरीता खुर्ची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२०५** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.५१** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल मधील विद्यार्थी ने-आण करणेकरीता ०४ नवीन स्कुलबस खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२०६** **प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी. शक्यतो देणगीदाराकडून देणगी स्वरुपात बसेस घेण्याचा प्रयत्न करावा.**

**(कार्यवाही-वाहन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.५२** **सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरीता श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील प्राथमिक व माध्यमिक विभागाकरीता तदर्थ (Ad-hoc) पध्दतीने मानधन तत्वावर सहायक शिक्षक पदभरतीबाबत.**

**निर्णय क्र.२०७** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.५३** **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाकरीता शालेय व स्कुलबस शुल्कात १० टक्के फी वाढीबाबत.**

**निर्णय क्र.२०८** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.५४** **श्री साईबाबा शैक्षणिक संकुलाकडील स्पोटर्स कॉम्प्लेक्स मधील बॅडमिंटन कोर्ट शुल्क 'सदस्यता फी' आकारणी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२०९** **तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.५५** **श्री साईबाबा महाविद्यालय-क्रिडा संकुलासाठी क्रिडा साहित्य खरेदी करणेकामी वाणिज्यीक ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीच्या प्रस्तावाबाबत.**

**निर्णय क्र.२१०** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.५६** **M/s Terralogic Software Solutions Pvt.Ltd. व M/s Oasys Tech Solutions Pvt. Ltd. यांनी अनुक्रमे संस्थानचे अधिकृत वेबसाईट व सोशल मिडीया संदर्भातील अनुषंगीक कार्यवाही त्यांचेमार्फत विनामोबदला स्वरुपात करुन देणेबाबत ई-मेलव्दारे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.**

**निर्णय क्र.२११** **एन.आय.सी., अ.नगर यांचे नियमास अधिन राहून M/s Terralogic Software Solutions Pvt. Ltd. यांचेमार्फत फक्त वेबसाईट नुतनीकरणाबाबतचा प्रस्ताव मंजूर. तसेच एन.आय.सी. कडून प्रमाणीत करुन घेण्यात यावे. M/s Oasys Tech Solutions Pvt. Ltd. यांचा सोशल मिडीया संदर्भातील प्रस्ताव मंजूर. प्रथम या संदर्भात करारनामा करुन घेण्यात यावा.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.५७** **MHT-CET परिक्षा तयारीसाठी विशेष वर्ग सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.२१२** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.५८** **शैक्षणिक संकुलाकडील जलतरण तलावासाठी नियमावली, शुल्क आकारणी करणेबाबत तसेच जलतरण जीवरक्षक (Life Guard) व जलतरण पंप ऑपरेटर तंत्रज्ञ यांची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.२१३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.५९ सेवानिवृत्ती नंतर जनरल सर्जन पदी पुर्ननियुक्ती मिळणेचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२१४ डॉ.रामप्रसन्ना नाईक यांचे मागील कालावधीतील काम पाहता त्यांना विशेष बाब म्हणून ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सध्या देय असलेल्या कंत्राटी वेतनावर घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६० श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी यांची आवश्यक रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीकरीता भरणेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जदारांच्या मुलाखतीबाबत.**

**निर्णय क्र.२१५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६१ श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरामध्ये भाडेतत्वावर औषध दुकान बाबत.**

**निर्णय क्र.२१६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६२ श्री साईनाथ रुग्णालय परिसरात पुढील ५ वर्षासाठी भाडेतत्वावर औषध दुकान चालविणेस देणेबाबत.**

**निर्णय क्र.२१७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६३ महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांच्या प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजूरी आदेशापेक्षा विमा कंपनीकडून कमी मिळालेल्या रकमेस वैद्यकीय सवलत म्हणून नावे टाकण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२१८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६४ श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये नोव्हेंबर-२०२४ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.७१,२९,८४२/- नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२१९ नोंद घेऊन खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६५ श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी (तज्ञ, अतिविशीष्ट तज्ञ) यांना श्री साईबाबा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्याप्रमाणे मासिक प्रोत्साहन भत्ता लागु करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२० शासनाचे दरपत्रकाची वैद्यकीय संचालक यांनी खात्री करुन फेरप्रस्ताव चक्रिय पध्दतीने सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.६६ वैद्यकीय उपचाराकामी रुग्णांकडून नोंदणीसाठी आकारणी करणेत येत असलेल्या केसपेपर शुल्क वाढीबाबत.**

**निर्णय क्र.२२१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१ संस्थानमार्फत करणेत येणारे बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्चरल सल्लासेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनल तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२२ तहकुब.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२ गोल्ड एटीएमची (GOLD ATM) सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.२२३ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३ संस्थानचे आर्थिक व्यवहारातील सहाय्यासाठी विना मानधन तत्वावर आर्थिक सल्लागार नियुक्त करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२४ तिरुपती तिरुमला देवस्थानचा अभिप्राय घेऊन फेर सादर करावे.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४ श्री साईबाबा मंदिरामध्ये ‘वृक्ष प्रसाद योजना’ सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२५ ‘वृक्ष प्रसाद योजना’ सुरु करणेस मान्यता. टिश्यु कल्चरने रोपे तयार करण्याचा प्रस्ताव नामंजूर. संस्थानने स्वत: किंवा शासकीय संस्थेमार्फत नर्सरी तयार करावी.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६ स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथील संस्थानचे परकीय चलन खात्याबाबत.**

**निर्णय क्र.२२७** स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथील संस्थानचे परकीय चलन खात्यातील रक्कम काढण्यासाठी पुर्वीचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.कान्हूराज बगाटे,भा.प्र.से यांचे स्वाक्षरी ऐवजी सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.गोरक्ष गाडीलकर,भा.प्र.से यांची स्वाक्षरी असा बदल करणेसाठी तसेच सध्याचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे मा.अध्यक्षा व मा.सदस्य यांची माहिति अद्ययावत करण्यासाठी बॅंकेच्या नमुन्याप्रमाणे चक्रिय पध्दतीने दि.२१.०३.२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. त्याची नोंद घेण्यात आली.

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**वरील निर्णय क्र.१५६ ते २२७ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ. ९.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**(डॉ.पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**[श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के)]**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**